

नांद्रे परिसरातील शेतकऱ्यांनी तंबाखूचे सौदे बंद पाडून जयसिंगपूर शहरातून मोर्चा काढला.

# जयसिंगपुरात तंबाखू सौदे बंद पाडले

## व्यापाऱ्यांनी दर पाडल्याचा निषेध

जयसिंगपूर : व्यापाऱ्यांनी तंबाखूचे दर पाडल्याच्या निषेधार्थ नांद्रे, वसगडे, शिरगांव, बेंद्री परिसरातील सुमारे सहाशेवर शेतकऱ्यांनी जयसिंगपूर येथील तंबाख़ूचे सौदे आज बंद पाडले. तंबाखूला प्रति मण (२० किलो) ३०० ते १३०० रूपयांपर्यंत तंबाखूला सौद्यात भाव काढण्यात आला. यामुळे शेतकरी संतप्त झाले. शेतकऱ्यांनी जोरदार विरोध दर्शविला. सौदे बंद पाडून शेतकऱ्यांनी तंबाखू विकण्यास नकार दिला. यावेळी जयसिंगपुरात शेतकऱ्यांनी निषेध मोर्चा काढला. अचानक उद्‌भवलेया या प्रसंगाने शहरात मोठी खळबळ उडाली.

प्रतिवर्षी गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर तंबाखूचे सौदे काढले जातात. गतवर्षी सुमारे २३०० रूपये प्रति मण दर काढलेला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी तंबाखूच्या पिकाकडे वळलेला होता. नांद्रे, शिरगाव परिसरात अनेक शेतकऱ्यांनी तंबाखूची लागवड केलेली आहे. आज गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर शेतकऱ्यांनी दर चांगला दर मिळेल या आशेने गेलेले होते. मात्र कमी दर मि ळाल्याने शेतकऱ्यांची घोर निराशा झाली. सुरूवातीला चांगल्या मालाला १३०० रूपये दर काढण्यात आला. त्यानंतर ७०० रूपये करून ३०० रूपयेपर्यंत दर खाली आणण्यात आला. तंबाखूचा उत्पादन खर्च व सौद्याला काढलेला दर यामध्ये मोठी तफावत झाल्याने शेतकरी संतप्त होऊन सौदे बंद पाडले. सौद्यावेळी वटाव १० टक्के, प्रति भोत्यास ५ किलोची सूट, पोत्याचे वजन ७० किलोच्या वर गेले की, २ किलोची सूट तसेच वाहतूक, जकात आदीमुळे शेतकऱ्यांच्या पदरात काहीच राहत नाही, अशा तक्रारी यावेळी शेतकऱ्यांनी केल्या. सर्व शेतकऱ्यांनी निषेधाच्या घोषणा देत मर्चंट असोशिएशनमधून काढता पाय घेतला. यावेळी शहरातून शेतकऱ्यांच्या लुटीचा निषेध असो अशा घोषणा देत मोर्चा काढण्यात आला.यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, उपाध्यक्ष उल्हास पाटील यांच्याशी आंदोलकांनी चर्चा केली. तसेच खासदार राजू शेट्टींना निवेदन देण्यात आले. यामध्ये बाळकृष्ण पाटील, विनायक पाटील, किरण पाटील, धनंजय मदाणे, वसंत मदाणे, शितल पाटील, सुरेश पाटील, रावसाहेब हांडे, शंकर खरमाटे, अर्जुन थोरात, वसंत खोत, महादेव कुंभार, आदी सह ६०० शेतकरी उपस्थित होते. यामध्ये बेंद्री- तासगांव २१, शिरगांव कवठे आळते, तासगांव, कवलापूर, हातकणंगले, खोतवाडी, दानोळी, सोनी, साबरवाडी, शिरगांव, मिरज टाकळी, नागावं, वसगडे, नांद्रे, कळंबी, मालगांव, चिपरी, बिसूर, बुधगांव, यागावातील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी आज आंदोलन केले. याबाबत बोलताना मर्चंट असोशिएशनचे अध्यक्ष शिवाजी पाटील म्हणाले की, यावर्षी तंबाखूचे उत्पादन जादा आहे. सरकारी कर जादा आहे. गतवर्षीची ६० हजार किलो तंबाखू पडून आहे. यामुळे यावेळी दर पडले असल्याचे त्यांनी सांगितले.



# महिन्याचे मोबाईल बिल १६ लाख!

- जावळीतील शेतकऱ्याला गंडा
- 'आंतरराष्ट्रीय कॉल करामती'मुळे बीएसएनएलचेच दणाणले धाबे



सातारा: ग्रामीण भागातील एखाद्या शेतकऱ्याच्या मोबाईलचे मासिक बिल किती रुपये येऊ शकते, अंदाज करता येईल का? २००... ५००... १०००... दहा हजार; यापुढे अंदाज जाऊ शकत नाही. जावळी तालुक्यातील एका शेतकऱ्याचे बिल झाले आहे १६ लाख रुपये! हो, ही काही 'प्रिंटिंग मिस्टेक' नाही, या व्यक्तीने गेल्या काही दिवसांत केलेल्या आंतरराष्ट्रीय कॉलचे हे बिल आहे. हे बिल पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या शेतकऱ्याला एका महाभागाने गंडा घातला आहे.

संबंधित शेतकऱ्याला सिमकार्डवर लॅपटॉप फ्री असे अमिष दाखवून त्याच्याकडून गोड बोलून एकाने बीएसएनएलचे महाकृषीसंचार कार्ड घेतले त्यानंतर त्याने त्या कार्डावरून क्रिकेटच्या बेटींगसाठी



आंतरराष्ट्रीय कॉल केले. त्याच्या फोनचे बिल तब्बल सोळा लाख रुपये आले. हे समजल्यावर शेतकरी अक्षरश: हदरून गेला आहे. बिलाची मर्यादा ओलांडल्याने कंपनीने त्याचा मोबाईल बंद करून ताबडतोब बिल न भरल्यास कारवाईचा इशारा दिला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जावळी तालुक्यातील मेढ्यासारख्या तालुक्याच्या ठिकाणी राहणारा हा शेतकरी जवळच्या एका फार्मवर नोकरी करतो. मेढ्याजवळ त्याची शेतीही आहे. 'बीएसएनएल'च्या महाकृषिसंचार योजनेतून त्याने जानेवारी महिन्यांत १०० रुपयांचा प्लॅन घेतला होता. रीतसर दोन हजार रुपये अनामत भरून त्याने आंतरराष्ट्रीय कॉलची सुविधाही घेतली होती. २४ मार्च रोजी त्याचे बिल पाहून 'बीएसएनएल' कंपनीतील अधिकाऱ्यांच्या भुवया उंचावल्या. संबंधितांच्या मोबाईल क्रमांकावरून अरब देशांमध्ये अनेक फोन झाले आहेत. त्यापोटी १६ लाख रुपयांचे बिल झाले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

याबाबतीत पोलिस ठाण्यातही तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्याच्या फोन कॉलची संपूर्ण माहिती घेतली असून बेटींगसाठी मुंबईतील एका बुकीने या शेतकऱ्याला फसवून पोस्टपेड कार्ड घेतले. त्यावरून अरब देशांत बेटिंगसाठी हजारो कॉल करण्यात आले. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याच्या आईला जबरदस्त धक्का बसलेला आहे. तसेच हा शेतकरी मुंबईतील त्या बेटिंग घेणाऱ्या माणसाचा शोध घेण्यासाठी मुंबईला गेला आहे. या घटनेची सातारा जिल्ह्यात जोरदार चर्चा सुरू असून बीएसएनएलचे अधिकारी यावर कोणती कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

# अण्णा जिंकले

भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे नेते व ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी जनलोकपाल विधेयक मंजूर करण्याच्या मागणीसाठी जंतर मंतरवरून सारा देश हालवून सोडला, केवळ चार दिवसात गांधी मार्गाने आंदोलन करून केंद्र सरकारला गुडघे टेकायला लावले.



जन लोकपाल विधेयक मंजूर करावे म्हणून अण्णांनी अनेक वर्षापासून अविरत लढा सुरू केला होता. मात्र निगरगट्ट राजकारण्यांनी हे विधेयक मंजूर करण्यासाठी टाळाटाळ करत होते. अनेक घोटाळ्यावर घोटाळे होत असताना कडक कायदा न करता भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची पाठराखण सरकारकडून केली जात होती. अण्णांनी माहिती अधिकार सारखा महत्वाचा कायदा लागू करून दिला. याव्दारेच अनेक घोटाळे उघडकीस आले. मात्र यांना जबर शिक्षा होत नव्हती. म्हणून त्यांच्यावर वचक बसविण्यासाठी जन लोकपाल विधेयकाची नितांत आवश्यकता होती. ती अण्णांच्या दणक्याने सरकारने अखेर मंजूरी दिली. देशाच्या विकासाला खिळ घालणाऱ्या भ्रष्टाचाराला मुळासकट उपटून काढण्याच्या दृष्टीने एक विधायक पाऊल अण्णांनी टाकले. अण्णांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा वणवा साऱ्या देशभर पेटला. देशाच्या कानाकोपऱ्यातून अण्णांच्या आंदोलनात सारी जनता रस्त्यावर उतरलेली होती. देशात एकाच वेळी अनेक ठिकाणी आंदोलनास प्रारंभ झाल्याने हीच अण्णा हजारेंची जनशक्ती बनलेली होती. जनशक्तीच्या रेट्यापुढे अखेर सरकारला गुडघे टेकणे भार पाडले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनीही या जनशक्तीच्या रेट्यात आपला सहभाग दर्शविला. तसेच स्वाभिमानी शेतकरी

## संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

पान ३ वर ▸

◆ वर्ष ६ ◆ अंक १० ◆१५ एप्रिल २०११ ◆ संपादक : खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे ◆ सहसंपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर
◆ व्यवस्थापक : सुभाष शेट्टी ◆ कार्यालय : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✲खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** **या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# अण्णा जिंकले

▶ पान २ वरुन

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सांगली - कोल्हापूर रस्ता चक्का जाम करून मार्ग बंद पाडून पाठिंबा दर्शविला. या जनशक्तीच्या रेट्यात आपणही पुढे आहोत. असे स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी दाखवून दिले. अण्णा हजारेच्या आंदोलनास विशेष करून युवकांचा मोठा प्रतिसाद लाभला. अगदी ३ वर्षाच्या मुलापासून ते ९७ वर्षेच्या वृध्द महिलेपर्यंत अण्णांची भेट घेऊन आंदोलनास पाठिंबा व्यक्त केला. शाळकरी, तसेच महाविद्यालयाच्या मुलांनीही उपोषण केले. एका नव्या स्वातंत्र्यांची पहाट देशात सुरु झाल्याचे दिसत होते. अतिरेक्यांपेक्षाही भ्रष्टाचार भयंकर असून त्याचा वेळीच खातमा केले नाही, तर उद्याची पिढीच बरबाद होईल असा इशारा अण्णा हजारे यांनी दिलेला आहे. त्यासाठीच अण्णांनी ही लढाई सुरू केलेली आहे. राजकारण्यांनी देशाची तसेच देशातील जनतेची वाट लावलेली आहे. याला वेळीत पायबंद घातला पाहिजे अन्यथा उद्याची भाव पिढी आपल्याला कदापि माफ करणार नाही.



आश्चर्यच! मी राजकारणी अन् तुम्ही बिल्डर! अन तरीही अजूनही इतके भूखंड शिल्लक आहेत याची आपल्या दोघांनाही काहीच कशी कल्पना नाही!!

TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
BCH स्टार्टर

अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/२४३४१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६१५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९


प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266


Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# उत्तर प्रदेशातील कारखाने साखरेच्या शोधात महाराष्ट्रात

## महाराष्ट्राच्या वाट्याला निर्यातीचा कमी कोटा

नगर : केंद्र सरकारने साखर निर्यातीच्या कोट्याचे निकष पूर्वीचेच ठेवले असून महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या वाट्याला निर्यातीचा कोटा कमी आला आहे. कमी कोट्यामुळे साखरेची निर्यात करण्यातील महाराष्ट्रातील कारखान्यांपुढच्या अडचणी लक्षात घेऊन उत्तर प्रदेशातील साखर कारखान्यांनी महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून साखर खरेदी करून निर्यातीचा निर्णय घेतल्याचे समजते. त्यासाठी उत्तर प्रदेशातील साखर कारखाने महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांकडून साखर मिळण्याबाबत चाचपणी करीत आहेत.



गेल्या तीन वर्षातील साखर उत्पादनाची सरासरी काढून त्यावर आधारित निर्यातीचा कोटा जाहीर करण्यात आला आहे. पाच लाख टन साखर निर्यातीच्या पूर्वीच्याच निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे मंत्री समितीने ठरविले आहे. जानेवारीत निर्यातीच्या कोट्याचे जे निकष ठरविले होते, त्यांचीच अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याबाबत अद्याप अधिसूचना निघालेली नाही. महाराष्ट्रात जादा साखर शिल्लक असताना साखर कारखान्यांना निर्यातीचा कोटा अतिशय कमी मिळाला आहे. दहा-पंधरा हजार पोत्यांचा कोटा निर्यात करणे कारखान्यांना शक्य नाही. दुसऱ्या कारखान्यांचा कोटा विकत घेऊन मोठ्या प्रमाणात साखर निर्यात करण्यासाठी राज्यातील काही साखर कारखानेही पुढे सरसावले आहेत. केंद्र सरकारने कोणत्याही राज्यातील कोणतेही कारखाने अन्य कारखान्यांच्या निर्यातीच्या कोट्यातील साखर विकत घेऊन निर्यात करण्यास परवानगी दिली आहे.

महाराष्ट्रातील कारखान्यांकडे कोटा कमी असून, निर्यातीची त्यांची क्षमताही कमी आहे. उत्तर प्रदेशातील खासगी कारखान्यांची क्षमता, तसेच आर्थिक स्थितीही चांगली आहे. उत्तर प्रदेशातील कारखान्यांना साखर वाहतुकीचा खर्च कमी करण्यासाठी महाराष्ट्रातील साखर खरेदी करणे अधिक सोपे आहे.


### श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३


■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.१५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन



हेर्ले : येथील शेतकरी ग्राम विकास सेवा संस्थेच्या अमृतमहोत्सवानिमित्त सभासदांना अमृतकलश प्रदान करताना खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री प्रकाश आवाडे, पी. एम. पाटील, अध्यक्ष भूपाल आलमान, उपाध्यक्ष अरविंद चौगुले.

# सहकाराचा पाया भक्कम; पण कळस डळमळीत

## खासदार राजू शेट्टी : हेर्लेतील शेतकरी ग्राम विकास सेवा संस्थेचा अमृतमहोत्सव

हेर्ले : सहकाराच्या शताब्दीकडे वाटचाल करत असताना सहकाराचा पाया (सेवा संस्था) भक्कम आहे; परंतु कळस (शिखर संस्था केडीसीसी) डळमळीत होत आहे. सहकारी सेवा संस्थांचे इमारत निधी, रिझर्व्ह फंड यासारखे करोडो रुपयांचे फंड जिल्हा बँकेमध्ये गुंतले आहेत. त्यावर गेल्या सहा वर्षापासून एक रुपयाही डिव्हिडंड मिळाला नाही. त्यामुळे सेवा संस्था अडचणीत आल्या आहेत, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते हेर्ले (ता. हातकणंगले) येथील शेतकरी ग्राम विकास सेवा संस्थेच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून गृहराज्यमंत्री सतेज पाटील होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ''२० वर्षे पाण्याखाली गेलेल्या जमिनीवर ऊसउत्पादन दाखवून कर्जमाफी घेणारी मंडळी आपल्या जिल्ह्यात कमी नाहीत. सहकाराच्या नावावर आपली दुकाने चालवित असतील, तर ते यापुढे चालू देणार नाही. त्यासाठी नाबार्डच्या सर्व योजनांमार्फत मिळणारा अर्थपुरवठा स्वबळावर चालणाऱ्या संस्थांना करावा, म्हणजेच सहकार जिवंत राहील.''

अध्यक्ष भूपाल आलमान यांनी स्वागत केले. शेतकरी सेवा संस्थेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या सोहळ्याच्या प्रास्ताविकामध्ये संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद चौगुले यांनी संस्थेचा आढावा घेतला.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते स्मरणिका प्रकाशन आणि सभासदांना अमृतकलश प्रदान करण्यात आला. गृहराज्यमंत्री सतेज पाटील म्हणाले, ''संस्थेने ७५ वर्षांत केलेली वाटचाल जिल्ह्याला एक आदर्श घालून देणारी आहे. त्यामुळे संस्थेच्या कोणत्याही कामकाजामध्ये आपले सदैव मदतीचे सहकार्य राहील.''

माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी शेतकरी सेवा संस्था ही शेतकऱ्यांच्या हिताचे काम करत आहे. लोक वाढत आहेत त्याप्रमाणे शेतजमिनीमध्ये वाढ होणार नाही. त्यामुळे शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, उत्पादनवाढ आणि प्रगतिशील शेती यासाठी शिबिर व व्याख्याने यामधून करून देण्याची संधी सभासदांना

पान ७ वर ▶

# केंद्राकडून 'एफ आरपी' वाढ केवळ ४.२४ टक्के; शेतकऱ्यांची निराशा

जयसिंगपूर : केंद्र सरकारने सन २०११-२०१२ च्या गळीत हंगामाच्या उसासाठी उचित व लाभकारी मूल्यात (फे अर अँड रेम्युनरेटीव्ह प्राईझ-एफ .आर.पी.) केवळ ४.२४ टक्के वाढ केली आहे. या अल्प दरवाढीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. त्यांच्याकडून केंद्र सरकारच्या या मूल्यवर्धक नीतीबद्दल 'राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला' अशी कडवट प्रतिक्रिया उमटली आहे.

केंद्र सरकारने चालू हंगामातील गळीत उसासाठी प्रतिटनास ९.५ साखर उताऱ्याला १३९१ रुपये व त्यापुढील एका टक्क्याच्या जादा उताऱ्यासाठी १४६ रु. प्रमाणे एफ आरपी जाहीर केले होते. तर २०११-१२ च्या गळीत उसासाठी ९.५ साखर उताऱ्याला १४५० व त्यापुढील एक टक्का उताऱ्यासाठी १५३ रु. प्रमाणे वाढ जाहीर केली आहे. पुढील हंगाम सुरू होण्यापूर्वी एफ आरपी जाहीर करण्याची प्रथा प्रथमता केंद्र सरकारने अंगिकारली. ही जरी समाधानाची बाब असली तरी सरकारचे कृषीविषयक धोरण सदोष व एकतर्फी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. वास्तविक केंद्र सरकारने स्थापन केलेल्या डॉ. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील कृषिमूल्य आयोगाने उसाला प्रती टनास ३३०० रु. दर देण्याची शिफारस केली आहे. त्याची दखल न घेता केंद्राने पूर्वपरंपरेनुसार आडमुठी भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

किंबहुना कृषी मालाचा उत्पादनखर्च वास्तवाला धरून निश्चित करण्याची प्रामाणिकता केंद्र सरकार अवलंबत नाही. केंद्र सरकारकडून जाहीर होत असलेल्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमती,



उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी आहेत. त्यासाठी आधारभूत किमती ठरविण्याच्या पद्धतीत सत्यवस्तुस्थितीसह पारदर्शकता असली पाहिजे व त्यामध्ये आमूलाग्र बदल आवश्यक आहे. याबद्दल कृषी विद्यापीठे, कृषिमंत्रालय व पंतप्रधानापासून राष्ट्रपतीपर्यंत दुमत असण्याचे कारण नाही. अनेक वेळा कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांसह लोकप्रतिनिधी व कृषी खात्याच्या मंत्र्यांनीसुद्धा याविषयी स्पष्ट मत मांडून कृषिमालाचा खरा उत्पादन खर्च व आधारभूत किमतीमध्ये ताळमेळ नसल्याचे कबूल केले आहे. तरीही 'कळते परंतु वळत नाही' अशी दुरवस्था कायम टिकून आहे. ऊस दराच्या एसएमपी व आताच्या एफ आरपी बाबतसुद्धा हेच घडते आहे हे दुर्दैव.

अलीकडच्या काही वर्षांत ऊस उत्पादनासाठी लागणाऱ्या मानव मजुरी, जमीन मशागत, रासायनिक खते, औषधे, वीज, इंधन यांच्या खर्चात भरमसाट वाढ झाली आहे. गत दोन वर्षांच्या कालावधीत केवळ ऊस तोडणीच्या मजुरीखर्चात ४३ टक्के वाढ झाली असून, साखर कारखान्यांच्या कामगारांच्या वेतनातही १८ टक्के वाढ देण्यात आली आहे. याशिवाय योजगार हमी योजनेच्या दैनंदिन मजुरी दरात ६० टक्के वाढ करून प्रतिदिन मजुरी १३० रु. पर्यंत निश्चित करण्यात आली आहे. वाढती महागाई व मनुष्यबळाची टंचाई या पार्श्वभूमीवर मजुरीच्या दरातील वाढ अनिवार्य आहे. याबद्दल मुळीच आक्षेप नाही. तथापि शेतमालाच्या आधारभूत किमतीसाठी, उत्पादन खर्चात वाढ झालेली महागाई का विचारात घेतली जात नाही? हा प्रश्न अनुत्तरीत का ठरत आहे?

वास्तविक कृषिप्रधान देश म्हणून आमच्या देशाची ख्याती आहे. शेतकरी सुखी तरच जग सुखी, या समीकरणावर राज्यकर्ते ठाम आहेत. इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो, अशी सद्भावना कृषिप्रधान देशाने बाळगली आहे. दरवर्षी शेतातील सरकारी गुंतवणूक कमी होत असून, पूर्वी शेकडा २.१ इतकी होती, आता ०.९ पर्यंत घसरली आहे. देशात सुमारे ६७ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून, राष्ट्रीय उत्पन्नाच्या २८ टक्के हिस्सा शेतीचा आहे. याकडे दुर्लक्ष करून शेती व शेतकऱ्यांचे खच्चीकरण करण्याचे धोरण सरकारकडून राबविले जात आहे. परिणामत: देशातील बहुतांशी शेतकऱ्यांनी आर्थिकदृष्ट्या शेती परवडत नाही, म्हणून शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करणे अथवा शेतीधंदा सोडून देण्याची भावना व्यक्त केल्याचे एका सर्वेक्षणात दिसून आले आहे; शिवाय शासकीय पातळीवर शेतीकडे दुर्लक्ष, उपेक्षा व हेटाळणी होत असल्याच्या भावनेतून

पान ८ वर ▶

# कृषिपंपांच्या वीज पुरवठ्यात वाढ करणार

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

इचलकरंजी : कृषिपंपांच्या वीज पुरवठ्यात वाढ करण्यात येणार असून याबाबतची घोषणा विधानसभेत करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या मोर्चाच्या शिष्टमंडळास दिले.

राज्यातील सिंगल फेजिंग ट्रान्सफॉर्मर्स व स्वतंत्र शेती फिडर्सवरील शेतीपंपाना किमान १० तास वीज दिली पाहिजे, असे विद्युत नियामक आयोगाचे आदेश आहेत; मात्र गेल्या १५ एप्रिल पासून हा पुरवठा फक्त ८ तासच केला जात आहे. यासंबंधी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने आयोगासमोर दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीमध्ये शासनाने भूमिका स्पष्ट करण्याचा आदेश दिला होता; मात्र शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली नाही.

या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध संघटनांनी विधान भवनावर सोमवारी मोर्चा आयोजित केला होता. आझाद मैदानातून निघालेल्या या मोर्चात २० हजारहून अधिक शेतकरी सहभागी झाली होते. विधानभवनावर आल्यानंतर मोर्चेधारकांच्या शिष्टमंडळाने विधान भवनातील मुख्यमंत्री दालनामुध्ये सुमारे तासभर चर्चा केली.

चर्चेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, वनमंत्री पतंगराव कदम, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यासह शिष्टमंडळातील प्रा. एन. डी. पाटील, खासदार राजू शेट्टी, प्रताप होगाडे, अशोक पाटील-किणीकर, आमदार गणपतराव देशमुख, आमदार चंद्रदीप नरके, सदाभाऊ खोत, मनोहर पाटील, रावसाहेब तांबे यांनी भाग घेतला.

उन्हाळी परिस्थीती व पिकांचे संभाव्य नुकसान या बाबी लक्षात घेऊन वीज पुरवठ्यामध्ये वाढ करण्यात येईल. याबाबतची घोषणा विधान सभेमध्ये करून त्याची अंमलबजावणी आगामी तीन-चार दिवसांत करण्यात येईल, असे आश्वासन श्री. चव्हाण व श्री. पवार यांनी चर्चेअंती शिष्टमंडळास दिले. मोर्चासमोर विविध संघटनांच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले. मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांच्याबरोबर झालेल्या चर्चेची माहिती दिल्यानंतर मोर्चा विसर्जित करण्यात आला.

वीज ग्राहक संघटना, राज्य इरिगेशन फेडरेशन, स्वाभिमानी शेतकरी संघटनासह अन्य संघटनांच्या नेतृत्वाखाली या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

## मांगलेत गटार बांधकामाचे उद्घाटन

मांगले : येथील गणेशनगर विभागातील गटार बांधकामाच्या कामाचे उद्घाटन शिराळा पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रल्हाद पाटील यांच्या हस्ते झाले. खासदार राजू शेट्टी यांच्या स्थानिक विकास निधीतून गटार बांधकामासाठी अडीच लाख रुपये निधी मिळाला आहे. यावेळी यशवंत ग्लुकोज कारखान्याचे संचालक राजन पाटील, भास्कर जगताप, सुनील मोहिते, दत्ता पाटील, शिवाजी शेवडे, विष्णू गावडे, प्रा. भीमराव गराडे उपस्थित होते.

## सहकाराचा पाया भक्कम; पण कळस डळमळीत

▶ पान ५ वरुन

उपलब्ध करून द्यावी, असे सुचविले.

या वेळी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डी. सी. पाटील, पंचगंगा साखर कारखान्याचे अध्यक्ष पी. एम. पाटील, जवाहर साखर कारखान्याचे संचालक आदगोंडा पाटील, सरपंच रियाज जमादार, उपसरपंच राजेश पाटील, पोपट चौगुले यांनीही आपल्या भाषणांतून संस्थेच्या कामकाजाला शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या आजी-माजी संचालकांचा व संस्था सेक्रेटरी पोपट बेडेकर यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

संकेश्वरच्या अरिहंत सोसायटी या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष भूपाल आलमान व उपाध्यक्ष अरविंद चौगुले यांचा सत्कार केला. याप्रसंगी हातकणंगले तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रसाद खोबरे, सुरेश पाटील (शिरोली) यांच्यासह सर्व संचालक व गावातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळ बाबर यांनी केले. आभार सुरेश चौगुले यांनी मानले.

# बनेवाडी उपसाची पाईपलाईन गावामधून नको डोंगराकडून न्या !

## बदलासाठी आक्रमक : शेतकऱ्यांचा आंदोलनाचा पवित्रा

देशिंग : कवठेमहांकाळ तालुक्यातील म्हैसाळ योजनेच्या मुख्य कालव्यापासून शेतीच्या पाण्यासाठी वंचित राहणाऱ्या गावांसाठी आखलेल्या बनेवाडी उपसा सिंचन योजनेचे काम सुरू आहे. योजनेची पाईपलाईन गावामधून जात आहे. त्यामुळे केवळ ३०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. ६९९ हेक्टर क्षेत्र वंचित राहणार आहे. डोंगराकडून योजनेची पाईपलाईन न्यावी, या मागणीसाठी खरशिंग ग्रामस्थांनी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली वर्षभरापासून प्रयत्न चालवले आहेत. आता लोक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

मुख्य कालव्याच्या पाण्यापासून वंचित राहणाऱ्या बनेवाडी, खरशिंग, अलकूड-एम भागातील ११ हजार हेक्टर क्षेत्रासाठी ४ कोटी ११ लाख रुपयांतून बनेवाडी उपसा सिंचन योजनेचे काम सुरू आहे. खरशिंगचे ६९९ हेक्टर क्षेत्र डोंगराकडून पाईपलाईन जात नसल्याने वंचित राहणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कामाचा गतवर्षी जानेवारी महिन्यात सर्व्हे झाला. डिसेंबरमध्ये पहिल्या सर्व्हेप्रमाणे दगड ठेवले होते. त्या नंतर जानेवारीत फेरसर्व्हे झाला. फेब्रुवारीत पाटबंधारे विभागाकडून चुन्याचे दगड व निशाण लावले होते. पाटबंधारेकडे वारंवार पाठपुरावा करूनही शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांनी १३ जानेवारीला गृहमंत्री आर. आर. पाटील यांना निवेदन दिले. ४ फेब्रुवारीला शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी रघुनाथराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. १ च्या कार्यकारी अभियंत्यांना भेटून १८२ शेतकऱ्यांच्या सहीचे निवेदन दिले.

खरशिंग ग्रामपंचायतीच्या ३ फेब्रुवारीच्या मासिक सभेचा ठरावही झाला होता. तरीही फेब्रुवारीत पाटबंधारे विभागाने कोणताही बदल न करता चुन्याचे दगड व निशाण लावले. ते संतप्त ग्रामस्थांनी विस्कटून दिले. खरशिंगकर मागणीवर ठाम राहिल्याने बनेवाडी उपसा सिंचन योजना वेळेत पूर्णत्वास जाईल का, या बाबत शंका उपस्थित केली जात आहे.

शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष नंदकुमार पाटील म्हणाले, ''गावच्या १४९५ हेक्टरपैकी ४९६ हेक्टर क्षेत्र डोंगर व पोटखराबीत जाणार आहे. असे असताना ३०० हेक्टर क्षेत्राला पाणी देऊन ६९९ हेक्टर क्षेत्र वंचित राहणार आहे. हा खरशिंगवर अन्याय आहे. वर्षभर पाठपुरावा केला. ४ फेब्रुवारीला पाटबंधारे विभागाने ग्रामस्थांची चर्चा करण्यास येणार असल्याचे सांगितले; परंतु अधिकाऱ्यांनी शब्द पाळला नाही. शेतकऱ्यांना आजअखेर टोलवले. आता आम्ही रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन करणार आहोत.''

# केंद्राकडून एफ आरपी वाढ केवळ ४.२४ टक्के; शेतकऱ्यांची निराशा

▶ पान ६ वरुन

शेतीमधील उत्पादकता घसरत असल्याचे विदारक चित्र पाहावे लागत आहे. या दुर्दशेला कृषिमालाला उत्पादन खर्चावर आधारभूत हमी भाव मिळत नाही, ही बाबच प्रमुख कारणीभूत आहे. शेतकरी संघटना उसाला प्रतिटनास २५०० ते ३००० रु. दराची मागणी करीत आंदोलन छेडत आहेत. त्यांच्या मागणीमागे ऊस उत्पादन खर्चाचा हिशेब आहे. याबद्दल किंचितही दखल न घेता केंद्र सरकार ४.२४ टक्के एफ आरपी जाहीर करून शेतकऱ्यांच्या दुखण्यावर मीठ चोळण्याचे पाप करीत आहे. यामुळे पुन्हा एकदा पुढील गळीत हंगामाच्या तोंडावर शेतकरी ऊसतोडबंदीचे आंदोलन छेडतील यात शंका नाही.

यापूर्वी एस.एम.पी.च्या तरतुदीनुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखर विक्रीच्या किमतीसह, सहविद्युत, इथेनॉल व अन्य उपपदार्थांच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यात शेकडा ५० टक्के वाढ दराद्वारे दोन, तीन हप्त्याने मिळत असे. आताच्या एफ आयपीच्या तरतुदीनुसार पहिल्या ॲडव्हान्स हप्त्याच्या दरापेक्षा जादा दर मागण्याचा कायदेशीर अधिकार शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे एफ आरपीचे धोरण ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मारक असून, ते साखर कारखानदारासह खासगी क्षेत्रातील साखर उद्योगाला लाभदायक व उपकारक आहे. या एफ आरपीच्या धोरणातून केंद्र सरकारचा दृष्टिकोन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध नाही, हे स्पष्ट होते.

## उसालासुद्धा दरवाढ मिळावी

ऊसतोडणी मजुरीच्या दरात गत दोन वर्षांच्या कालावधीत ४३ टक्के वाढ होऊन कमिशनसह प्रतिटन १६५ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. तरीसुद्धा ऊस तोडणी मजूर संघाचा आता प्रतिटनास २०० रु. मजुरीसाठी आग्रह असून, २० टक्के कमिशनसह हा मजुरीदर २४० रु. पर्यंत जाण्याची शक्यता आहे. ही दरवाढ उसाच्या अंतिम दरातून कपात होणार आहे. याच प्रमाणात उसालासुद्धा दरवाढ मिळावी, अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अपेक्षा असली तरी उसाच्या दरात मात्र ४.२४ टक्के वाढ एफ आरपीतून झाली आहे.

# केंद्राकडून 'एफ आरपी' वाढ केवळ ४.२४ टक्के; शेतकऱ्यांची निराशा

जयसिंगपूर : केंद्र सरकारने सन २०११-२०१२ च्या गळीत हंगामाच्या उसासाठी उचित व लाभकारी मूल्यात (फे अर अँड रेम्युनरेटीव्ह प्राईझ-एफ .आर.पी.) केवळ ४.२४ टक्के वाढ केली आहे. या अल्प दरवाढीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. त्यांच्याकडून केंद्र सरकारच्या या मूल्यवर्धक नीतीबद्दल 'राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला' अशी कडवट प्रतिक्रिया उमटली आहे.

केंद्र सरकारने चालू हंगामातील गळीत उसासाठी प्रतिटनास ९.५ साखर उताऱ्याला १३९१ रुपये व त्यापुढील एका टक्क्याच्या जादा उताऱ्यासाठी १४६ रु. प्रमाणे एफ आरपी जाहीर केले होते. तर २०११-१२ च्या गळीत उसासाठी ९.५ साखर उताऱ्याला १४५० व त्यापुढील एक टक्का उताऱ्यासाठी १५३ रु. प्रमाणे वाढ जाहीर केली आहे. पुढील हंगाम सुरू होण्यापूर्वी एफ आरपी जाहीर करण्याची प्रथा प्रथमता केंद्र सरकारने अंगिकारली. ही जरी समाधानाची बाब असली तरी सरकारचे कृषीविषयक धोरण सदोष व एकतर्फी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. वास्तविक केंद्र सरकारने स्थापन केलेल्या डॉ. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील कृषिमूल्य आयोगाने उसाला प्रती टनास ३३०० रु. दर देण्याची शिफारस केली आहे. त्याची दखल न घेता केंद्राने पूर्वपरंपरेनुसार आडमुठी भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

किंबहुना कृषी मालाचा उत्पादनखर्च वास्तवाला धरून निश्चित करण्याची प्रामाणिकता केंद्र सरकार अवलंबत नाही. केंद्र सरकारकडून जाहीर होत असलेल्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमती,



उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी आहेत. त्यासाठी आधारभूत किमती ठरविण्याच्या पद्धतीत सत्यवस्तुस्थितीसह पारदर्शकता असली पाहिजे व त्यामध्ये आमूलाग्र बदल आवश्यक आहे. याबद्दल कृषी विद्यापीठे, कृषिमंत्रालय व पंतप्रधानापासून राष्ट्रपतीपर्यंत दुमत असण्याचे कारण नाही. अनेक वेळा कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांसह लोकप्रतिनिधी व कृषी खात्याच्या मंत्र्यांनीसुद्धा याविषयी स्पष्ट मत मांडून कृषिमालाचा खरा उत्पादन खर्च व आधारभूत किमतीमध्ये ताळमेळ नसल्याचे कबूल केले आहे. तरीही 'कळते परंतु वळत नाही' अशी दुरवस्था कायम टिकून आहे. ऊस दराच्या एसएमपी व आताच्या एफ आरपी बाबतसुद्धा हेच घडते आहे हे दुर्दैव.

अलीकडच्या काही वर्षांत ऊस उत्पादनासाठी लागणाऱ्या मानव मजुरी, जमीन मशागत, रासायनिक खते, औषधे, वीज, इंधन यांच्या खर्चात भरमसाट वाढ झाली आहे. गत दोन वर्षांच्या कालावधीत केवळ ऊस तोडणीच्या मजुरीखर्चात ४३ टक्के वाढ झाली असून, साखर कारखान्यांच्या कामगारांच्या वेतनातही १८ टक्के वाढ देण्यात आली आहे. याशिवाय योजगार हमी योजनेच्या दैनंदिन मजुरी दरात ६० टक्के वाढ करून प्रतिदिन मजुरी १३० रु. पर्यंत निश्चित करण्यात आली आहे. वाढती महागाई व मनुष्यबळाची टंचाई या पार्श्वभूमीवर मजुरीच्या दरातील वाढ अनिवार्य आहे. याबद्दल मुळीच आक्षेप नाही. तथापि शेतमालाच्या आधारभूत किमतीसाठी, उत्पादन खर्चात वाढ झालेली महागाई का विचारात घेतली जात नाही? हा प्रश्न अनुत्तरीत का ठरत आहे?

वास्तविक कृषिप्रधान देश म्हणून आमच्या देशाची ख्याती आहे. शेतकरी सुखी तरच जग सुखी, या समीकरणावर राज्यकर्ते ठाम आहेत. इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो, अशी सद्भावना कृषिप्रधान देशाने बाळगली आहे. दरवर्षी शेतातील सरकारी गुंतवणूक कमी होत असून, पूर्वी शेकडा २.१ इतकी होती, आता ०.९ पर्यंत घसरली आहे. देशात सुमारे ६७ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून, राष्ट्रीय उत्पन्नाच्या २८ टक्के हिस्सा शेतीचा आहे. याकडे दुर्लक्ष करून शेती व शेतकऱ्यांचे खचीकरण करण्याचे धोरण सरकारकडून राबविले जात आहे. परिणामत: देशातील बहुतांशी शेतकऱ्यांनी आर्थिकदृष्ट्या शेती परवडत नाही, म्हणून शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करणे अथवा शेतीधंदा सोडून देण्याची भावना व्यक्त केल्याचे एका सर्वेक्षणात दिसून आले आहे; शिवाय शासकीय पातळीवर शेतीकडे दुर्लक्ष, उपेक्षा व हेटाळणी होत असल्याच्या भावनेतून

पान ८ वर ▶

# कृषिपंपांच्या वीज पुरवठ्यात वाढ करणार

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

इचलकरंजी : कृषिपंपांच्या वीज पुरवठ्यात वाढ करण्यात येणार असून याबाबतची घोषणा विधानसभेत करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या मोर्चाच्या शिष्टमंडळास दिले.

राज्यातील सिंगल फेजिंग ट्रान्सफॉर्मर्स व स्वतंत्र शेती फिडर्सवरील शेतीपंपाना किमान १० तास वीज दिली पाहिजे, असे विद्युत नियामक आयोगाचे आदेश आहेत; मात्र गेल्या १५ एप्रिल पासून हा पुरवठा फक्त ८ तासच केला जात आहे. यासंबंधी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने आयोगासमोर दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीमध्ये शासनाने भूमिका स्पष्ट करण्याचा आदेश दिला होता; मात्र शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली नाही.

या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध संघटनांनी विधान भवनावर सोमवारी मोर्चा आयोजित केला होता. आझाद मैदानातून निघालेल्या या मोर्चात २० हजारहून अधिक शेतकरी सहभागी झाली होते. विधानभवनावर आल्यानंतर मोर्चेधारकांच्या शिष्टमंडळाने विधान भवनातील मुख्यमंत्री दालनामुध्ये सुमारे तासभर चर्चा केली.

चर्चेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, वनमंत्री पतंगराव कदम, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यासह शिष्टमंडळातील प्रा. एन. डी. पाटील, खासदार राजू शेट्टी, प्रताप होगाडे, अशोक पाटील-किणीकर, आमदार गणपतराव देशमुख, आमदार चंद्रदीप नरके, सदाभाऊ खोत, मनोहर पाटील, रावसाहेब तांबे यांनी भाग घेतला.

उन्हाळी परिस्थीती व पिकांचे संभाव्य नुकसान या बाबी लक्षात घेऊन वीज पुरवठ्यामध्ये वाढ करण्यात येईल. याबाबतची घोषणा विधान सभेमध्ये करून त्याची अंमलबजावणी आगामी तीन-चार दिवसांत करण्यात येईल, असे आश्वासन श्री. चव्हाण व श्री. पवार यांनी चर्चेअंती शिष्टमंडळास दिले. मोर्चासमोर विविध संघटनांच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले. मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांच्याबरोबर झालेल्या चर्चेची माहिती दिल्यानंतर मोर्चा विसर्जित करण्यात आला.

वीज ग्राहक संघटना, राज्य इरिगेशन फेडरेशन, स्वाभिमानी शेतकरी संघटनासह अन्य संघटनांच्या नेतृत्वाखाली या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

## मांगलेत गटार बांधकामाचे उद्घाटन

मांगले : येथील गणेशनगर विभागातील गटार बांधकामाच्या कामाचे उद्घाटन शिराळा पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रल्हाद पाटील यांच्या हस्ते झाले. खासदार राजू शेट्टी यांच्या स्थानिक विकास निधीतून गटार बांधकामासाठी अडीच लाख रुपये निधी मिळाला आहे. यावेळी यशवंत ग्लुकोज कारखान्याचे संचालक राजन पाटील, भास्कर जगताप, सुनील मोहिते, दत्ता पाटील, शिवाजी शेवडे, विष्णू गावडे, प्रा. भीमराव गराडे उपस्थित होते.

## सहकाराचा पाया भक्कम; पण कळस डळमळीत

▶ पान ५ वरुन

उपलब्ध करून द्यावी, असे सुचविले.

या वेळी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डी. सी. पाटील, पंचगंगा साखर कारखान्याचे अध्यक्ष पी. एम. पाटील, जवाहर साखर कारखान्याचे संचालक आदगोंडा पाटील, सरपंच रियाज जमादार, उपसरपंच राजेश पाटील, पोपट चौगुले यांनीही आपल्या भाषणांतून संस्थेच्या कामकाजाला शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या आजी-माजी संचालकांचा व संस्था सेक्रेटरी पोपट बेडेकर यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

संकेश्वरच्या अरिहंत सोसायटी या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष भूपाल आलमान व उपाध्यक्ष अरविंद चौगुले यांचा सत्कार केला. याप्रसंगी हातकणंगले तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रसाद खोबरे, सुरेश पाटील (शिरोली) यांच्यासह सर्व संचालक व गावातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळ बाबर यांनी केले. आभार सुरेश चौगुले यांनी मानले.

# बनेवाडी उपसाची पाईपलाईन गावामधून नको डोंगराकडून न्या !

## बदलासाठी आक्रमक : शेतकऱ्यांचा आंदोलनाचा पवित्रा

देशिंग : कवठेमहांकाळ तालुक्यातील म्हैसाळ योजनेच्या मुख्य कालव्यापासून शेतीच्या पाण्यासाठी वंचित राहणाऱ्या गावांसाठी आखलेल्या बनेवाडी उपसा सिंचन योजनेचे काम सुरू आहे. योजनेची पाईपलाईन गावामधून जात आहे. त्यामुळे केवळ ३०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. ६९९ हेक्टर क्षेत्र वंचित राहणार आहे. डोंगराकडून योजनेची पाईपलाईन न्यावी, या मागणीसाठी खरशिंग ग्रामस्थांनी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली वर्षभरापासून प्रयत्न चालवले आहेत. आता लोक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

मुख्य कालव्याच्या पाण्यापासून वंचित राहणाऱ्या बनेवाडी, खरशिंग, अलकूड-एम भागातील ११ हजार हेक्टर क्षेत्रासाठी ४ कोटी ११ लाख रुपयांतून बनेवाडी उपसा सिंचन योजनेचे काम सुरू आहे. खरशिंगचे ६९९ हेक्टर क्षेत्र डोंगराकडून पाईपलाईन जात नसल्याने वंचित राहणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कामाचा गतवर्षी जानेवारी महिन्यात सर्व्हे झाला. डिसेंबरमध्ये पहिल्या सर्व्हेप्रमाणे दगड ठेवले होते. त्या नंतर जानेवारीत फेरसर्व्हे झाला. फेब्रुवारीत पाटबंधारे विभागाकडून चुन्याचे दगड व निशाण लावले होते. पाटबंधारेकडे वारंवार पाठपुरावा करूनही शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांनी १३ जानेवारीला गृहमंत्री आर. आर. पाटील यांना निवेदन दिले. ४ फेब्रुवारीला शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी रघुनाथराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. १ च्या कार्यकारी अभियंत्यांना भेटून १८२ शेतकऱ्यांच्या सहीचे निवेदन दिले.

खरशिंग ग्रामपंचायतीच्या ३ फेब्रुवारीच्या मासिक सभेचा ठरावही झाला होता. तरीही फेब्रुवारीत पाटबंधारे विभागाने कोणताही बदल न करता चुन्याचे दगड व निशाण लावले. ते संतप्त ग्रामस्थांनी विस्कटून दिले. खरशिंगकर मागणीवर ठाम राहिल्याने बनेवाडी उपसा सिंचन योजना वेळेत पूर्णत्वास जाईल का, या बाबत शंका उपस्थित केली जात आहे.

शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष नंदकुमार पाटील म्हणाले, ''गावच्या १४९५ हेक्टरपैकी ४९६ हेक्टर क्षेत्र डोंगर व पोटखराबीत जाणार आहे. असे असताना ३०० हेक्टर क्षेत्राला पाणी देऊन ६९९ हेक्टर क्षेत्र वंचित राहणार आहे. हा खरशिंगवर अन्याय आहे. वर्षभर पाठपुरावा केला. ४ फेब्रुवारीला पाटबंधारे विभागाने ग्रामस्थांची चर्चा करण्यास येणार असल्याचे सांगितले; परंतु अधिकाऱ्यांनी शब्द पाळला नाही. शेतकऱ्यांना आजअखेर टोलवले. आता आम्ही रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन करणार आहोत.''

# केंद्राकडून एफ आरपी वाढ केवळ ४.२४ टक्के; शेतकऱ्यांची निराशा

▶ पान ६ वरुन

शेतीमधील उत्पादकता घसरत असल्याचे विदारक चित्र पाहावे लागत आहे. या दुर्दशेला कृषिमालाला उत्पादन खर्चावर आधारभूत हमी भाव मिळत नाही, ही बाबच प्रमुख कारणीभूत आहे. शेतकरी संघटना उसाला प्रतिटनास २५०० ते ३००० रु. दराची मागणी करीत आंदोलन छेडत आहेत. त्यांच्या मागणीमागे ऊस उत्पादन खर्चाचा हिशेब आहे. याबद्दल किंचितही दखल न घेता केंद्र सरकार ४.२४ टक्के एफ आरपी जाहीर करून शेतकऱ्यांच्या दुखण्यावर मीठ चोळण्याचे पाप करीत आहे. यामुळे पुन्हा एकदा पुढील गळीत हंगामाच्या तोंडावर शेतकरी ऊसतोडबंदीचे आंदोलन छेडतील यात शंका नाही.

यापूर्वी एस.एम.पी.च्या तरतुदीनुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखर विक्रीच्या किमतीसह, सहविद्युत, इथेनॉल व अन्य उपपदार्थांच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यात शेकडा ५० टक्के वाढ दराद्वारे दोन, तीन हप्त्याने मिळत असे. आताच्या एफ आयपीच्या तरतुदीनुसार पहिल्या ॲडव्हान्स हप्त्याच्या दरापेक्षा जादा दर मागण्याचा कायदेशीर अधिकार शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे एफ आरपीचे धोरण ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मारक असून, ते साखर कारखानदारासह खासगी क्षेत्रातील साखर उद्योगाला लाभदायक व उपकारक आहे. या एफ आरपीच्या धोरणातून केंद्र सरकारचा दृष्टिकोन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध नाही, हे स्पष्ट होते.

## उसालासुद्धा दरवाढ मिळावी

ऊसतोडणी मजुरीच्या दरात गत दोन वर्षांच्या कालावधीत ४३ टक्के वाढ होऊन कमिशनसह प्रतिटन १६५ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. तरीसुद्धा ऊस तोडणी मजूर संघाचा आता प्रतिटनास २०० रु. मजुरीसाठी आग्रह असून, २० टक्के कमिशनसह हा मजुरीदर २४० रु. पर्यंत जाण्याची शक्यता आहे. ही दरवाढ उसाच्या अंतिम दरातून कपात होणार आहे. याच प्रमाणात उसालासुद्धा दरवाढ मिळावी, अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अपेक्षा असली तरी उसाच्या दरात मात्र ४.२४ टक्के वाढ एफ आरपीतून झाली आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला महिना ५४ रुपये

सांगली : आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुबांना शासनाने मदत म्हणून तीस हजार रोख तर ७० हजार रुपये पोस्टात त्यांच्या नावावर ठेवण्यात आले. डोक्यावर लाखोंचा कर्जाचा बोजा असताना पोस्टातील व्याजाची रक्कम महिन्याला केवळ ५४ रुपये कुटुंबीयांना मिळत आहे. कर्ता पुरुषच गेल्याने डोंगर कसा फ ेडायचा असा प्रश्न कुटुंबीयांसमोर आहे. ही त्यांची थट्टा आहे.

शासनाच्या आकडेवारीनुसार २००२ ते २००८ या कालावधीत राज्यात ४ हजार ५८९ शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्या. शासनाने त्यांना एक लाखाची मदत जाहीर केली. २४५१ आत्महत्याग्रस्त कुटुंब पात्र ठरली. आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मदत मिळवून देण्यासाठी जनता दलाचे नेते शिवाजीराव परुळेकर, ॲड. के. डी. शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. अशा कुटुंबीयांचा शासनाविरोधात लढा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हानिहाय बैठका सुरू आहेत. आज या संदर्भात येथे बैठक होत आहे.

नैसर्गिक आपत्तीनंतर कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या करीत जीवन यात्रा संपवली. सहा वर्षांत राज्यातील ४ हजार ५८९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे शासनाने मान्य केले. प्रत्यक्षात आत्महत्या केलेल्यांची संख्या यापेक्षा जास्त आहे. आत्महत्याचे प्रमाण वाढल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर शासनाने एक लाख रुपयांची मदतीची घोषणा केली. राजकीय नेत्यांच्या हस्ते मदतीचा धनादेश देत जाहीर प्रसिद्धी झाली. मात्र, जाचक निकषातून केवळ २ हजार ४५१ आत्महत्याग्रस्त कुटुंबे लाभास पात्र ठरली. ९७ आत्महत्येची प्रकरणे प्रलंबित आहेत. आत्महत्या नेमक्या का झाल्या, याचा शोध दोन वर्षांपासून सुरू आहे.

बँकेची नोटीस आहे का? नावावर जमीन आहे का? हे निकष लावत शासनाने २ हजार ४१ कुटुंबांना मदत नाकारली. सावकाराचे कर्ज, बापाच्या नावावर जमीन असलेल्या मुलाची, आत्महत्या झालेल्या कुटुंबीयांना मदतीबाबत सरकारने अजब न्याय दिला आहे. मदतीचीही थट्टा केली आहे. रोख तीस हजार रुपये व सत्तर हजार रुपये मुदत ठेवीने पोस्टात ठेवले आहेत. त्याचे व्याज प्रती महिना ५४ रुपये मिळते. लाखो रुपयांच्या कर्जाचा बोजा असताना तुटपुंजी मदत घेऊन करायचे काय? असा प्रश्न कुटुंबीयांसमोर आहे. घरातील कर्ता पुरुषच गेल्याने कर्जाचा डोंगर वाढत आहे. ही कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. ती जमिनी विकत आहेत.



# नवीन कारखाने उभारणीला मर्यादा

मुंबई : राज्यात नवीन साखर कारखाना उभारण्यासाठी आवश्यक जागा सध्याच्या कारखान्यापासून किमान २५ किलोमीटर लांब असली पाहिजे, असा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत गुरुवारी घेण्यात आल्याचे समजते. त्यामुळे नवीन कारखाने उभारणीला मर्यादा येणार असून, सध्याच्या कारखान्यातील अंतर्गत स्पर्धेला आळा बसेल. त्यांना उपलब्ध उसाचा वापर करता येईल.

सध्या कारखान्याच्या जागेपासून नवीन कारखान्यांची जागा किमान १५ किलोमीटर असावे, अशी अट आहे. त्यामुळे नव्याने दोनशे कारखाने होऊ शकत होते. हे अंतर २५ किलोमीटर केल्याने, नव्या कारखान्यांची संख्या ४० पर्यंत मर्यादित होऊ शकेल, असे साखर कारखानदारी क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितले.

नॅशनल शुगर फेडरेशनने दोन कारखान्यांतील अंतर किमान ४० किलोमीटर असावे, असा ठराव केला आहे. ऊस नियंत्रण कायद्यानुसार कारखान्यांतील अंतर १५ किलोमीटरऐवजी २५ किलोमीटर करण्याची शिफारस राज्य सरकार केंद्र सरकारकडे करू शकते. त्यामुळे राज्य सरकार त्यांचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविणार आहे. केंद्राच्या मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी होईल.

सध्या राज्यात १६५ कारखान्यांमध्ये उसाचे गाळप सुरू आहे. त्यामध्ये १२२ सहकारी आणि अन्य खासगी कारखाने आहेत. राज्यात साडेदहा लाख हेक्टर क्षेत्रावर उसाची लागवड झाली असून, आठशे लाख



टन ऊस गाळण्यासाठी उपलब्ध आहे. उसाला पाणी अधिक प्रमाणात लागत असल्याने ऊस लागवडीत फारशी वाढ होण्याची शक्यता नाही. उपलब्ध उसासाठी सध्याचे कारखाने पुरेसे आहेत.

कारखान्यांची संख्या वाढल्यास त्यासाठी त्यांच्यात जीवघेणी स्पर्धा होईल. ऊस गाळपासाठी कमी उपलब्ध झाल्यास कारखाने आर्थिक अडचणीत येईल. जुन्यांसह नवीन कारखानेही आजारी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे दोन कारखान्यांतील अंतर वाढविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे समजते.



मी निर्दोष आहे! मंत्री झाल्यावर माझ्या पूर्वीच्या मंत्रीमहोदयांची धोरणं मी पुढे चालू ठेवली अन् आपोआपच माझ्या हातून भ्रष्टाचार घडू लागला!!



पूर्वी लोक अक्षरशः रजा टाकून क्रिकेटची मॅच टीव्हीवर पाहायचे! आता तसं होत नाही! सारेजण नियमितपणे ऑफिसमध्येच कॉम्प्युटरवर मॅचेस बघतात!!

# पीक कर्जः शासनाकडून शेतकऱ्यांची फसवणूकः 'स्वाभिमानी'चे निवेदन

कोल्हापूर (प्रतिनिधी): शासनाने दिलेल्या सवलतीच्या दरातील पीक कर्जाबाबत शेतकऱ्यांची घोर फवसणूक केली असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदनाव्दारे केलेली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी नियमित कर्जफेड केल्यास पन्नास हजार रूपयापर्यंतच्या कर्जास शून्य टक्के व्याज आकारणीचा निर्णय शासनाने घेतला. हा निर्णय गेल्यावर्षी घेण्यात आला. त्यासाठी राज्य सरकारने २ कोटीची तरतूदही करण्यात आलेली होती. गेल्या वर्षीच्या या निर्णयानंतर याही वर्षी अर्थसंकल्प सादर होताना रूपये पन्नास हजार पर्यंतच्या कर्ज बिन व्याजी करण्याचा निर्णय जाहीर झाला ही गोष्ट शेतकऱ्यांच्या दृष्टीने समाधानकारक आहे, मात्र वस्तुस्थिती विचित्र आहे. वास्तविक गतवर्षीच निर्णय झाला असल्याने चालू हंगामातील वसुली करताना सोसायट्यांनी व्याज घेणे उचित नव्हते. परंतु शासकीय निर्णयाची माहिती फक्त प्रसारमाध्यमांपुरतीच राहिलेली आहे काय ? अशी शंका व्यक्त होत आहे. कारण ऊस पिकातून कर्ज वसुली व्याजासह सोसायटीकडे होत आहे. मात्र या मर्यादेपर्यंत असणाऱ्या कर्जालाही व्याज घेतले जात आहे. दुसरे म्हणजे याही वर्षी



शासनाने कर्ज सवलतीची घोषणा केली. म्हणजे गेल्या वर्षी शासन खोटे बोलले का? याचा खुलासा व्हावा. वृत्तपत्रात माहिती छापून आणण्यासाठी घडपडणाऱ्या या शासनाला योजनेची कार्यवाही त्वरीत करता आलेली नाही. निर्णय होऊन ही कर्जावरील व्याज वसुलीला केवळ शासनच जबाबदार असून त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केलेली आहे.

शासकीय निर्णय डावलून शेतकऱ्यांकडून सोसायटीने व्याज वसुली केली आहे. त्यामुळे गतवर्षीच्या पीक कर्जाच्या व्याज वसुलीसाठी संस्थापातळीवर शेतकरी सभासदामध्ये वाद होत आहे. व्याज वसुलीच्या दमदाटी प्रकारामुळे सोसायटी शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे. राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, पतसंस्था यांनी पीक कर्ज दिले त्यांनी व्याजाची वसुली केली नसल्याचे सांगण्यात आले. मग फक्त सोसायटी व जिल्हा बँकेचीच अरेरावी कशाबद्दल? याचा खुलासा व्हावा.

गतवर्षीपासून शेतकऱ्यांना कर्ज व्याज माफीची घोषणा झाली. ती शेतकऱ्यांपर्यंत वृत्तपत्रातून पोहचली. पण या योजनेच्या अंमलबजावणीसाठी व पाठपुराव्यासाठी सोसायटी व बँक संचालकांच्या प्रयत्न करणे गरजेचे होते. परंतु सहकारी संस्थेतील एकाही संचालकांनी शेतकऱ्यांसाठी प्रामाणिक प्रयत्न केलेले नाहीत. उलट सवलत दिलेली व्याजाची रक्कम बेकायदेशीरपणे वसूल करण्याचा सपाटा लावला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबद्दल सोसायटी व बँक संचालकांवर त्वरीत कारवाई करण्यात यावी. असे निवेदनात म्हटले आहे, निवेदनाची प्रत कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेली असून त्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे, माजी जिल्हाध्यक्ष बापूसो चौगुले, शिरीष वरेकर, मनोहर पुजारी, शकील मुजावर आदी उपस्थित होते.

# दुसरी हरितक्रांती होणार कधी?

जयसिंगपूर (प्रतिनिधी) : जगभरातले सर्व माणसांचे पोट भरावे इतके अन्न पुरवावे. आज म्हणजे २०११ साली जगाची लोकसंख्या ७ अब्ज आहे. आणि या लोकसंख्येला कसेबसे पुरेल इतके धान्य सध्या उत्पादीत होत आहे धान्याचे साठे कमी होत आहे. हवामानातील बदलामुळे कोठे कोठे उत्पादन कमी होत आहेत. व अंतर्गत अन्न सुरक्षेसाठी नेहमी धान्य निर्यात करणारे देश धान्य निर्यातीवर बंदी घालत आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर धान्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

२०२० सालापर्यंत जागतिक लोकसंख्या ९ अब्ज होईल. म्हणजे सुमारे ३० टक्के वाढेल. त्यांच्यासाठी अन्न उत्पादन किमान ३० टक्के तरी वाढवावे लागेल, अन्न उत्पादनासाठी वापरली जाणारी जमीन मात्र कमी होत चाललेली आहे. वातावरणातील बदलामुळे अवर्षण, अतिपाऊस, अकाली पाऊस, पूर वादळे यांचे प्रमाण वाढू लागले आहे. विविध कारणांनी जमिनीच्या उत्पादकता कमी होत चाललेली आहे. कीडनाशकांना दाद न देणाऱ्या किडींची संख्य व उपद्रव वाढत आहे. सिंचन क्षमता वाढविण्यामध्ये अडथळे येत आहेत. जागतिक स्तरावरील अर्थ घोटाळे, मध्य पूर्वेतील राजकीय उलथापालथी, चीन - भारतासारख्या विकसनशील देशांत वाढती खनीज तेलांची मागणी, त्यामुळे वाढणारे इंधनांचे भाव, वाढते व्याजदर, यामुळे शेतीचा अर्थपुरवठा, गुंतवणूक वाढणे अवघड झाले आहे. शेतीला ऊर्जा पुरवठा तेल आणि वीज यांच्या स्वरूपात होण अवघड आणि महाग झाले आहे. १९७० च्या दशकात पहिल्या हरितक्रांतीने अन्न सुरक्षा दिली. त्यामध्ये सुधारित बियाणे, वाढती सिंचन क्षमता, ही वाढलेल्या लोकसंख्येची किमान गरज झाली आहे. २०२० पर्यंत ३० टक्के उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाची, दुसऱ्या हरितक्रांतीची गरज आहे. कोणतेही नवीन संशोधन करून ते प्रत्यक्ष वापरात येण्यास ५ - १० वर्षे जात असल्याने २०२० सालानंतर प्रत्यक्ष भूकबळी पडल्यानंतर धान्यासाठी दंगे झाल्यानंतर संशोधन करू, असे म्हणणे करणे मुर्खपणाचे ठरेल. त्यासाठी त्वरीत औद्योगिककरण रोखणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखून कमी क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचे सोयीचे ठरेल.

# राज्य सहकारी बँक ७७५ कोटींच्या तोट्यात

मुंबईः राज्य सहकारी बँक तब्बल ७७५ कोटींच्या तोट्यात असताना ताळेबंदात फेरफार करून २.८७ कोटीचा नफा दाखविण्यात आला असल्याचा आरोप विरोधकांनी केलेला आहे. या बँकेवर राज्य सरकारचा वरदहस्त लाभत असल्यानेच या शिखर बँकेत धुडगूस सुरू असल्याचा आरोप आमदारांनी केलेला आहे.

बँकेने दिलेल्या एकूण कर्जपैकी तब्बल ७५ टक्के कर्ज बुडीत निघाले आहे. त्यापैकी ५८ टक्के कर्ज साखर कारखाने तर १७ टक्के कर्ज सुतगिरण्यांचे आहे. त्यामुळे बँक डबघाईला आल्याची जाणीव झाल्याने पुणे, सांगली, सातारा, अहमदनगर आणि कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकांनी आपल्या ठेवी काढून घेतल्या आहेत. परंतु बँक डबघाईला आलेली असतनाही बँकेचे अध्यक्ष आणि संचालक मंडळ मात्र महागड्या गाड्या घेऊन उधळपट्टी सुरू केली असल्याचा आरोपही करण्यात आलेला आहे. या बँकेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळाला असला तरी बँकींग परवाना मिळालेला नाही. तरीदेखील ही बँक १७ शाखा, नागपूर येथे विभागीय कार्यालय आणि २ विस्तार कक्षासह बँकींग व्यवहार करीत आहे. बँकेने ८६ मालमत्ता जप्त केल्या. मात्र राजकीय दबावापोटी एकाचीही विक्री करण्यात आलेली नाही. यामुळे बँकेचे ३ हजार ८०६ कोटींचे नुकसान झालेले आहे. ४४.०२ टक्के निगेटिव्ह आणि एनपीएचे प्रमाण ३१ टक्क्यांवर गेल्याने ही बँक बुडीत निघण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करून बँक वाचवावी अशी मागणी होत आहे.


# साखरेची त्वरीत निर्यात करण्यासाठी खा. शेट्टींची वाणिज्यमंत्र्यांना साकडे

नवी दिल्ली(स्वाभिमानी वृत्तसेवा): देशातील साखरेची त्वरीत निर्यात करा असे, साकडे खासदार राजू शेट्टी यांनी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री आनंद शर्मा यांना घातले. यावेळी शर्मा यांना यासंबधीचे निवेदन दिले.

यावेळी खासदार राजू शेट्टी म्हणाले की, देशात ५० लाख टन साखरेचा अतिरिक्त साठा आहे. जागतिक बाजारपेठेत साखरेच्या दराला चांगली मागणी आहे. देशात साखरेचा साठा पडून असल्याने साखर कारखान्यांचे मोठे नुकसान होत आहे. पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून याचा ऊस दरावर विपरीत परिणाम होत आहे. तरी शेतकऱ्यांचा विचार करून देशातील शिल्लक साखर त्वरीत निर्यात करावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली.



वाणिज्यमंत्र्यांना निवेदन देताना खासदार राजू शेट्टी.



मला कल्पना आहे, आपले शेकडो कोटी बेहिशेबी पैसे परदेशी बँकांत आहेत! पण त्याला काळा पैसा म्हणतात ते मला आज कळलं!!



मी निर्दोष आहे! मंत्री झाल्यावर माझ्या पूर्वीच्या मंत्रीमहोदयांची धोरणं मी पुढे चालू ठेवली अन् आपोआपच माझ्या हातून भ्रष्टाचार घडू लागला!!



जयसिंगपूर : अण्णा हजारेंच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी 'स्वाभिमानी'तर्फे पदयात्रा काढण्यात आली.

# अण्णांच्या समर्थनार्थ 'स्वाभिमानी'चा सांगली-कोल्हापूर मार्गावर चक्का जाम

▶ पान १ वरुन

आंदोलन करण्यात आले. यामुळे महामार्गावर सुमारे २ तास वाह-तूक ठप्प झालेली होती. अण्णा तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है. केंद्र सरकारचा धिक्कार असो अशा घोषणा देत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सांगली - कोल्हापूर मार्गावर ठिय्या मारला. यावेळी बोलताना डॉ. महावीर अक्कोळे म्हणाले की, या देशामध्ये बोकाळलेल्या थोराम ोठ्यांच्या भ्रष्टाचारावर प्रभावीपणे अंकुश ठेवण्यासाठी आणि भ्रष्टाचाराचा रोग या देशातून समूळ नष्ट होण्यासाठी जन लोकपाल विधेयक व्यवस्थितपणे व सर्व पध्द-तीने विचार करून मांडण्यासाठी अण्णा हजारे यांनी केलेल्या मागण्या रास्त असून वेळ न दवडता मंजूर होण्याची गरज आहे. पण राज्य व केंद्र सरकार विनाकारण त्यात वेळ घालवत आहे. याचा निषेध म्हणून हे आंदोलन करण्यात आलेले आहे. दोन तासाहून अधिक काळानंतर जयसिंगपूर पोलिसांनी हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष उल्हास पाटील, सावकर मादनाईक, सुभाष शेट्टी, संदीप राजोबा, पंचायत समिती सदस्या सौ. प्रमिला पाटील, विजयकुमार चौगुले, राजू पवार, अशोक चौगुले, रावसाहेब मरजे, राजेंद्र दाईंगडे, महेंद्र रूणवाल, शैलेश आडके, शैलेश चौगुले, दिलीप बजाज, योगेश चौगुले आदी उपस्थित होते.




...आणि या देदिप्यमान विजयाबद्दल या महान खेळाडूंना प्रत्यक्ष बंगल्याऐवजी आता या बंगल्याची फक्त प्रतिकृतीच भेट द्यायची असं ठरवलंय!!




# अण्णांचा लढा

अण्णा हजारेंचा जगन्नाथांचा रथ उभा राहिला खास
कोणत्याही शस्त्रापेक्षा प्रभावी ठरला हा विश्वास!

लोकपाल विधेयकाचा मुद्दा प्रत्येकाच्या मेंदूत शिरतो
व्यवस्थेच्या विरूध्द जो - तो हाती तलवार घेतो!

अण्णा तुम्ही लढा, तुम्हा अवघ्या भारतीयांची साथ आहे
हक्कांसाठी परिवर्तनाच्या तुफानाची ही सुरवात आहे. !

भ्रष्टाचाराच्या कर्दमात सारे जगणे कठीण होत आहे.
सावध असा, शोषणाविरूध्द ठिणगी इथेच पडत आहे!

भ्रष्टाचार पाहिलात, साहिलात खूप, आता जागर घडवू
आपल्याच आसपास असलेले असे क्षेत्र न् क्षेत्र लढवू !

भ्रष्टाचारमुक्त समाज हे अण्णांच्या चळवळीचे केंद्र आहे
नवा उन्मेषयुक्त बदलाचा त्यात जगाचा संदर्भ आहे!

सामाजिक क्रांतीचा वेगळेपणा हे सामर्थ्य अण्णांच्या उपोषणाचे
इतिहासाला नायक फिरवतोय रथचक्र समतेच्या पोषणाचे !

लोकसेवकाच्या भूमिकेत अण्णांनी जीवन समर्पित केले आहे
काश्मीर ते कन्याकुमारीचे काठ त्यांच्या जयजयकाराने भिजले आहे!

आता त्याच देशातून सुसंस्कृतीचा सूर्य तळपत राहील
तोवर आपणाला मानवी हक्कांसाठी लढलेच पाहिजे!

भ्रष्टाचाराचा काळोखी पहाड खोडून संपत नाही तोवर
हाती मशाल घेऊन जागत राहिले पाहिजे!

**प्रा. डॉ. रविकिरण बुलबुले**
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर



# अब्दुललाटमध्ये स्वाभिमानी दूध संघामार्फत १५ म्हशींचे वाटप

जयसिगपूर (प्रतिनिधी): अव्दुललाट (ता. शिरोळ) येथील स्वाभिमानी दूध संकलनामार्फत हरियाणा जातीच्या १५ म्हशींचे वाटप करण्यात आले.

दूध उत्पादकांच्या मागणीचा विचार करून खासदार राजू शेट्टींच्या प्रयत्नामुळे व श्री भरत अर्बन बँकेच्या प्रयत्नातून १५ शेतकऱ्यांना अब्दुललाट येथे १५ म्हशींचे वाटप करण्यात आले. यामुळे येथील दूध संकलनामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. सुरुवातीला प्रति म्हैस ४० हजार रूपये प्रमाणे १० म्हशींचे वाटप करण्यात आले. त्यानंतर ५ म्हशीचे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी संस्थेने सभासदांना अतिरिक्त बोनस ही दिलेला आहे. त्यामुळे सभासद वर्गातून उत्साहाचे वातावरण असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते महावीर गिरमल यांनी सांगितले. यासाठी खासदार राजू शेट्टी, स्वाभिमानी दुधाचे कार्यकारी संचालक डॉ. सुभाष अडदंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी महावीर पाटील, डेअरी व्यवस्थापक दीपक कोळी व सर्व संचालकांचे सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले.

# आले नफा मिळवून देणारे बहुगुणी पीक

आले हे बहुगुणी मसाल्याचे व भरघोस नफा मिळवून देणारे पीक म्हणून ओळखले जाते. हे पीक कोल्हापूर जिल्ह्यासारख्या खात्रीशीर पाऊस पडणाऱ्या भागात आल्याची लागवड फायदेशीर होऊ शकते. म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या भागात आल्याची लावगड करून भरपूर पैसा मिळवणे शक्य आहे.

आल्याची लागवड दमट व उबदार हवामान असल्यास उत्तम ठरते. एप्रिल ते मे महिन्यात ३० ते ३५ अंश सेल्सिअस तापमान असल्यास उगवणीसाठी अनुकूल असते. कोरडी थंड हवा थेट पोसण्यास मदत होते. आल्यासाठी हलकी ते मध्यम चांगली निचरा होणारी भूसभुशीत जमिन योग्य असते. आल्याच्या पिकानंतर त्याच जमिनीत आल्याचे पीक घेऊ नये. जमिन तयार करताना १० ते १५ टन शेणखत अथवा कंपोस्ट खत, तसेच ७ ते १० कि. ट्रायको डरमा व्हिरडी जीवाणू खत मिसळून शेतभर पसरावे. महाराष्ट्रात मोक्या, अंगाऱ्या, जमेता जपानी अशा आल्याच्या जाती आहेत. त्यातील एखादी जात निवडावी.

लागवडीसाठी आल्याची २०५ ते ३ सेंमि. लांबीचे व २५ ते ३० ग्रॅम वजनाचे रोगविरहीत बेणे, १ ते २ डोळे असलेली खात्रीशीर ठिकाणातून घ्यावेत. कंद कुजव्या व कंदमाशी पिकास लागू नये. म्हणून लागवडीपूर्वी बियाण्यास ५० टक्के बिएचसी, डायथेन एम ४५, थायरस याची द्रवणात भिजवून नंतर बियाणे लावडीसाठी वापरावेत.

लागवडीसाठी चांगल्या प्रतिचे बियाणे हे १५०० किलो वापरावा. लागवण शक्यतो एप्रिल मे महिन्यात करावे. लागवणीसाठी सपाट पध्दत वापरून २ बाय १ मिटर किंवा दीड बाय३ मीटर सपाट वाफ्यात २५ बाय २२.५ मिटर किंवा २० बाय २० सेमी अंतरावर शक्यतो ५ सेमी जादा खोल कंद जाणार नाही असे करावा. काही भागात सरी - वंरबा पध्दतीत लागवड करून चांगले उत्पन्न मिळवले आहे.



## पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

पिकाच्या जोमदार वाढीसाठी प्रति हेक्टरी ७५ किलो नत्र, ३५ किलो स्फूरद व ३५ किलो पालाश असे रासायनिक खताचा डोस द्यावा. स्फूरद व पालाश लागणीवेळी व नत्र दोन टप्प्यात द्यावे. उन्हाळ्यात पाणी १० ते १२ दिवसाच्या अंतराने पावसाळ्यात शक्यतो पाणी देण्याची गरज भासत नाही. व हिवाळ्यात १८ ते २० दिवसाच्या अंतराने द्यावे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात खोल खुरपण करावी व माती भूसभुशीत करून कंदाभोवती लावावेत. त्यामुळे कंद पोसण्यास मदत होते. लागण केल्यापासून ६ते ७ महिन्यात फुलाचे कोंब बाहेर येऊ लागतात. त्यावेळी गड्डे पोसू लागतात असे समजावे.



आल्याचे पान पिवळे पडल्यास पीक काढणीसाठी योग्य समजून कुदळीने काढावे. सुंठ तयार करण्यासाठी २४५ ते २६० दिवसांनी निभार झाल्यानंतर काढावीत. कंद निवडलेले स्वच्छ धुवून घ्यावेत. त्यानंतर कंदावरील पापुंद्री काढावी व कंद तारेच्या चौकोनी पिंजऱ्यात ठेवावेत. नंतर ३ वेगवेगळ्या भांड्यात २०, २५ व ५० टक्के सोडिएम हायड्राक्साईड म्हणजे कॉस्टीक सोड्याचे द्रावण तयार करावे. व ती उकळावीत. आल्याचे कंद असलेला तारेचा पिंजरा प्रथम सोडाखार मिश्रणाच्या २० टक्के द्रावणात ५ मि. बुडवून ठेवावा. ५० सोडाखार द्रावणामध्ये कंदाचा पिंजरा अर्धा मिनटे बुडवून नंतर ४ टक्के ॲसिड द्रावणात दोन तास बुडवून ठेवावेत. हे कंद बाहेर काढून स्वच्छ धुवावेत व नंतर वाळवावेत. यालाच सुंठ म्हणतात. चांगले नियोजन करून आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल. म्हणून आल्याचे लागवड ही शेतकऱ्यांची काळाची गरज आहे.